जाहिरात क्र. १/१५२, दि. २०/०७/१०

# पुणे महानगरपालिका

## जाहिरात प्रकटन

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदांसाठी निवडयादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक अभियंता/ विकास अभियंता (ट्रॅफिक प्लॅनर) (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | बी.ई.(सिव्हिल) किंवा एम.ई.(सिव्हिल) ट्रॅफिक इंजिनिअरिंग अनुभव ट्रॅफिक इंजिनिअरिंग कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव. | १ | निवडयादी १- खुला | **पथ/वाहतूक विभाग** |
| २ | सांख्यिकी व संगणक प्रमुख (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | १) मान्य विद्यापीठाची शास्त्र शाखेकडील संख्या शास्त्र विषय घेऊन किमान द्वितीय श्रेणीतील पदवीधारक.<br>२) सरकारमान्य तांत्रिक प्रशिक्षण संस्था किंवा विद्यापीठ यांचेकडील कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मधील पदव्युत्तर पदवी/पदविकाधारक.<br>३) संगणक क्षेत्रातील सांख्यिंकी कामाचा शासकीय,<br>निमशासकीय अथवा खासगी संस्थेमधील कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य. | १ | निवडयादी १- खुला | **सांख्यिकी व संगणक विभाग** |
| ३ | उप आयुक्त (जनरल) (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | १) कोणत्याही शाखेच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर व त्यास प्रशासकीय कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव | १ | निवडयादी १-खुला | **मनपाची विविध खाते** |
| ४ | क्षेत्रिय अधिकारी (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | अ) इंजिनिअरींगमधील पदवीधर :- बी.ई.(सिव्हील) अथवा कोणत्याही शाखेचा पदवी किंवा पदविकाधारक असावा व कनिष्ठ अभियंता व त्यावरील पदाच्या कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>ब) इंजिनिअरींगमधील पदवीकाधारक :- डी.सी.ई./डी.ई.ई. या कनिष्ठ अभियंता व त्यावरील पदाच्या कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) एम.बी.बी.एस वैद्यकिय क्षेत्रातील उमेदवाराचा क्षेत्रिय अधिकारी या | २ | निवडयादी २-खुला | **मनपाची विविध क्षेत्रिय कार्यालये** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पदाकरीता विचार करण्यात येणार नाही.<br>ड) इतर शाखांचे पदविधर सिनिअर ग्रेड लेखनिक अगर वरिष्ठ संवर्गातील किमान १० वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक या शिवाय मनपा व संलग्न संस्थामधील पदव्युत्तर (पोस्ट ग्रॅज्युएट) शैक्षणिक पात्रताधारक सेवकांनी त्यांनी पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या दिनांकापासूनचा कालावधी हा त्यांच्या १० वर्षाच्या अनुभवासाठी ग्राह्य धरणेत येईल. | | | |
| ५ | प्रकल्प संचालक (प्रोजेक्ट डायरेक्टर नागरवस्ती विकास योजना) (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते+मोटार कार भत्ता) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण.<br>ब) अर्बन कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोजेक्टमध्ये प्रकल्प अधिकारी म्हणून २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. | १ | निवडयादी १- खुला | **नागरवस्ती विकास योजना** |
| ६ | उप आरोग्य प्रमुख (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते+मोटार कार भत्ता) | १) मान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस.पदवी डी.पी.एच. पदविका उत्तीर्ण.<br>२) प्रशासकीय कामाचा विशेषत: सहायक आरोग्य प्रमुख या या पदाचा कमीत कमी ४ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>३) पुणे म.न.पा.सेवेतील उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. | १ | निवडयादी १-खुला | **आरोग्य कार्यालय** |
| ७ | सहाय्यक आरोग्य प्रमुख (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० (ग्रेड पे+ मान्य भत्ते+मोटार कार भत्ता) | एम.बी.बी.एस. उत्तीर्ण, डी.पी.एच. उत्तीर्ण/सरकारी निमसरकारी खात्यातील सार्वजनिक आरोग्यविषयक कामाचा ३ ते ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ३ | अज-१ संभाव्य रिक्त होणारी पदे खुला- २ (पैकी १ जागा अपंगांसाठी राखीव) | **आरोग्य कार्यालय** |

**अटी:-**

१) **वयोमर्यादा** :-

(**अ**) जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे

(**ब**) माजी सैनिक, अपंग व प्रकल्पग्रस्त/भूकंपप्रगस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

(**क**) स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू यांना ५ वर्ष शिथीलक्षम व जनगणना अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

(**ड**) पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागू होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

३) अर्जामध्ये अपंग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक याचा स्पष्ट उल्लेख करावा व त्याबाबतचे आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडवीत. प्रमाणपत्रे जोडली नसल्यास त्यास समांतर आरक्षणाचा फायदा दिला जाणार नाही.

४) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.

५) वरील अनुक्रमांक १ ते ५ येथील पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये ऊज्ञएअउउ सोसायटीच्या अधिकृत उउउ किंवा ज स्तर, किंवा अ स्तर, किंवा इ स्तर, किंवा उ स्तर, किंवा चड-उखढ परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

६) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

७) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता-गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.

९) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१०) उमेदवार सरकारी/निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खातेप्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

११) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१३) अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१४) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१५) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२, दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे स्वत:कडे राखून ठेवीत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

**१७) बिगर मागास गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु. १००/- किंमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली सेवकवर्ग विभाग कार्यालय, रुम नं.२४०, दुसरा मजला, पुणे मनपा, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे ५ येथे दि.२३/७/२०१० ते दि.४/८/२०१० अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.५/८/२०१० दुपारी ४.०० पर्यंत सेवकवर्ग विभाग कार्यालय, रुम नं.२४०, दुसरा मजला, पुणे मनपा, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे ५ येथे स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

**सही/-**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**